Golden Research Thoughts ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-10 | April-2015 Available online at www.aygrt.isrj.org

# म. फुले यांचे वाङ्:मयीन □ार्य

**देवेंद्र बाबुराव नि□म**
(मराठी विभाग प्रमुख) स्वो. वि. संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे .

**Authors Short Profile**



## सारांश :

म. फुले आधुनिक युगातील कृतिशील तत्वचिंतक, आणि 'आद्य मराठी वाङ्:मयाचे जनक' होते. त्यांचा वाङ्:मयीन □तृत्वाचा काळ १८५० ते १८९० असा आहे. त्यांनी जे समाजकार्य केले, चळवळी केल्या, त्या समाजकार्याला व चळवळीला बळ देण्यासाठी, आणि आपल्या या महान □ार्याच्या प्रचारार्थ त्यांनी विविध ग्रंथ रचना केली. त्यांच्या □ाळात साहित्यानिर्मिती ही तशी उच्चवर्णीयांचीच मिरासदारी होती तरीही जोतीरावांनी विपूल लेखन □लेले आढळते. त्यांनी आपल्या लेखनात ग्रंथ, पद्य लेखनाबरोबरच नाटक हा वाङ्मयप्रकारही हाताळला आहे.

"शोषितांच्या मनात स्वत:च्या गुलामगिरीची जाणीव जागवुन तिच्याबद्दलची चीड त्यांच्या मनात पेरायची आणि शूद्रातिशुद्रांना पिढयानपिढया गुलामगिरीत डांबुन ठेवणा-यांच्या दांभिकतेचे बुरखे ओरबाडायचे हे त्यांच्या लेखना मागील उद्दिष्ट होते". [१] म. फुल्यांच्या वाङ्:मयातून आणि चळवळी मधून आपल्याला प्रेरणा मिळाल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कृतज्ञतापूर्वक नमूद केलेले आहे.

## प्रस्तावना

"डॉ. आंबेडकरांप्रमाणेच अनेक महापुरुषांना ज्या वाङ्:मयातून मार्गदर्शन लाभले ते फुले वाङ्:मय आहे. हे साहित्य महाराष्ट्राला आणि भारतीय समाजजीवनाला समतेची दिशा देणारे साहित्य आहे'. [२]

जोतिरावांचे जे लेखन आज उपलब्ध झाले आहे, त्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे.

## तृतीय रत्न - (नाटक)

म. फुले यांनी सर्वप्रथम १८५५ मध्ये तृतीय रत्न हे नाटक लिहिले. 'शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे'. हा संदेश त्यांनी या नाटकातून दिला. जेव्हा आपल्या समाजात फार मोठा वर्ग निरक्षर होता, वाचू लिहू शकत नव्हता. तेव्हा सामाजिक प्रबोधनाचा मंत्र म. फुल्यांनी या नाटकाच्या माध्यमातून समाजासमोर मांडला.

म. फुल्यांनी 'तृतीय रत्न' हेच नाव का निवडले असावे या संदर्भात दत्ता भगत लिहितात. "समुद्र मंथनाच्या □क्षेत सागरातून जी रत्ने क्रमाने बाहेर आली. त्यातले तिसरे रत्न लक्ष्मी आणि चौदावे रत्न 'असूड' म्हणजे चाबुक 'असूड' या शब्दाचा वापर म. फुले यांनी केला आहे. शूद्रांना शिक्षण मिळावे हा म. फुले यांच्या आयुष्याचा ध्यास आहे. शूद्र खचले कारण वित्त गेले. हा अनर्थ अविद्येमुळे झाला. तेव्हा हे वित्तवैभव अथवा ऐश्वर्य म्हणजे तिसरे रत्न - म्हणजे लक्ष्मी" [३] प्रस्तुत नाटकात कुणबी स्त्री आणि तिचा नवरा हे दोघे म. फुले यांनी सुरु केलेल्या रात्रीच्या शाळेत जाण्याचा निर्णय घेतात नाटकाच्या शेवटी येणारी म. फुले त्यांची भूमिका आणि प्रस्तुत शीर्षक यांची संगती म्हणून या नाटकाच्या नावाबद्दल शंका घेण्याचे कारण नाही.

"धर्माच्या नावाखाली या देशातल्या स्त्री शूद्रांवर मानसिक गुलामगिरी लादण्यात आली आहे. ही गुलामगिरी स्विकारण्यात स्त्री शूद्रांना धन्यता वाटावी म्हणून त्यांना अज्ञानी ठेवले. त्यांनी तसेच अज्ञानी राहावे याची भटब्राह्मण सतत व्यवस्था करीत असतात. म्हणून हे मानसिक दास्य दूर व्हायचे असेल तर स्त्री शूद्रांनी आधुनिक शिक्षण घ्यावे"[४] असा उपदेश म. फुले यांनी या नाटकव्दारे दिला आहे. ज्ञानप्राप्ती ही सर्व प्रगतीच्या मार्गाची गुरुकिल्ली आहे. म्हणून ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी स्त्री शूद्रातिशूद्रांनी प्रवृत्त आहे. असे तृतीय नाटकात आवाहन करण्यात आले आहे.

"सामाजिक समस्यांना हात घालणारे , सामाजिक बांधिलकी सांगणारे आणि सर्वार्थांनी आधुनिक असणारे हे मराठीतील पहिले आधुनि□ नाटक आहे". [५] म्हणून म. फुले हे 'आद्य नाटककार' आहेत असा डॉ. एस.एस.भोसले यांनी जो गौरव केला आहे तो उचित असा आहे."

## □ुलामगि□िरी - (ब्राह्मणी धर्माच्या आडपडद्यात)

□ुलामगिरी (सुधारल्या इंग्लिश राज्यांत) असे या ग्रंथाचे पुर्ण नाव आहे. जोतिरावांनी "युनै्टेड स्टेटस मधील सदाचारी लोकांनी गुलामास दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरापेक्षता व परोपकार बुध्दी दाखवली यास्तव त्यांच्या सन्मानार्थ हे लहानसे पुस्तक त्यास परम प्रीतीने नजर करितों आणि आपले देशबांधव त्यांचा स्तुत्यकृत्याचा कित्ता, आपले शुद्र बांधवास ब्राह्मणलोकांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामांत घेतील अशी आशा "[७] त्यांनी या अर्पणपत्रिकेत व्यक्त केली आहे. " The day that reduces a man to slavery

takes from him the half of his virtue " - Homer [८] ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो, त्या दिवशी त्यांचा अर्धा सद्गुण जातो. गुलामगिरीच्या प्रस्तावनेच्या प्रारंभीच होमरचे हे प्रसिध्द वचन दिले आहे.

विषमतावादी, मानवी, असत्यावर आधारित, अशा ब्राह्मणीव्यवस्थने बहुजन समाजावर कसे अन्याय अत्याचार केले या कडे सर्वांचे लक्ष वेधावे, या हेतूने या ग्रंथाची रचना केली असून, बहुजन समाजाने त्यावर विचार □रावा आणि या ब्राह्मणी व्यवस्थेतून आपली मुक्तता करुन घ्यावी हा त्या ग्रंथामागचा मुख्य उद्देश होता.

हा □थ प्रश्-नोत्तर रुपात आहे. त्यात सोळा प्रकरणे आहेत. धार्मिक, सामाजिक, आर्थिक विषमता आणि शोषणाची कठोर अशी चिकित्सा म. फुल्यांनी या ग्रंथातून केलेली दिसते. हा संपूर्ण ग्रंथ धोंडिबा आणि जोतीराव या दोघातील संवादाच्या स्वरुपात आहे. यातील संवादरुपी शैलीमूळे दलित - शोषित - शेतकरी - समाजाला चटकन समजनारा आहे.

**<u>शेतक-यांचा असूड -</u>** भारतीय पंरपरेत शेतीचा गंभीरपणे विचार सर्वप्रथम म. फुले यांनी □ला. त्यांनी शेतक-यांचा □ालावलेल्या स्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन करुन या ग्रंथाची मांडणी केली आहे. या ग्रंथाची सुरुवात

" विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली
□तीविना वित्त गेले
वित्तविना शुद्र खचले
एवढे अनर्थ एका अविद्येने केले" [९]

'अज्ञान ' हेच एकमेव शूद्रतिशुद्राचे दु:खाचे कारण आहे असे त्यांनी उपोद्घातात म्हटले आहे. पुढे ते लिहितात शूद्र शेतकरी हल्ली इतक्या दैन्यवाण्या स्थितीत येऊन पोहोचण्याची धर्म व राज्य संबंधी अनेक कारणे आहेत त्यापैकी थोडयाबहुतांचे विवेचन करण्याच्या हेतूने हा पुढील ग्रंथ रचिला आहे [१०] शूद्र शेतकरीवर्गाची दीनवाणी हालाखीची स्थिती आणि ती □ा □र्मा□ झाली त्या कारणांचा वेध घेण्यासाठी या ग्रंथाची निर्मिती केल्या गेली आहे.

एकुण आशय आणि लेखनशैली या दोन्ही दृष्टींनी 'शेतक-याचा असूड " हा ग्रंथ वैशिष्टयपूर्णच नव्हे तर सामाजिक इतिहासाच्या संदर्भात आणि वाङ्:मयीन इतिहासाच्या संदर्भात अत्यंत महत्वाचा आहे". [११] असे नोंदवणे भाग पडते.

**सत्सार :-**

१८८५ साली म. फुल्यांनी हे नियतकालिक सुरु केले एका पाठोपाठ दोन अंक निघाले, त्यानंतर 'सत्सार' चे अंक निघाले नाहीत. परंतु एका महिन्याच्या आत एक हजार प्रती या अंकाच्या खपल्या होत्या. या अंकात म. फुल्यांच्या लेखनशैलीचा अविष्कार तर दिसतोच परंतु त्यांची लोकप्रियताही दिसून येते.

सत्सारच्या पहिल्या अंकात म. फुल्यांनी ब्राह्मोसमाज आणि प्रार्थनासमाजाच्या विसंगतीवर बोट ठेवले आहे. तसेच पंडिता रमाबाईंच्या धर्मांतरा संबंधी उल्लेख असून त्यांच्या संबंधी आदरपूर्वक चर्चाही □ली आहे. 'ब्राह्मणांशी

ते नेहमी काहीसे कडवटपणे आणि खरमरीत सूरात बोलत असत'[१२] असे त्यांच्या आणि ब्राह्मणाच्या संवादावरुन दिसून येते.

सत्सारचा दुसरा आक्टोंबर १८८५ मध्ये प्रसिध्द झाला. या अंकाच्या उपोद्घातात जोतीराव लिहितात 'हल्ली या देशातील इंग्रज बहाद्राचे राज्याच्या प्रतापाने गांजलेल्या स्त्रियांस तुरळक तुरळक लिहिता वाचता येऊ लागले आणि तेणेकरुन आज हजारो वर्षापासुन आर्यधूर्त जनांकडून एकदंर सर्व स्त्रियांचा सर्वोपरी छळ झाला व हल्ली होत आहे, ही सर्व पुरुषांची ठकबाजी, स्त्रीया डोळ्यांपुढे मांडावी म्हणून या अंकात थोडा प्रयत्न केला आहे" [१३]

हिंन्दु धर्म शास्त्रात स्त्रियांविषयी जे अन्यायी, जुलमी पक्षपाती धोरण आखले गेले त्या विषयी म. फुल्यांनी □डाडून टीका केली आहे. त्याच प्रमाणे पंडीता रमाबाई व ताराबाई शिंदे यांची निंदानालस्ती करणा-या टीकाकारांचा □रपूस समाचार या अंकात घेतला आहे.

या नियतकालिमधील लेखन संवाद स्वरुपाचे असून या दोन अंकानंतर सत्सारचा अंक निघाला नाही.

**सार्वजनिक सत्यधर्म** - "म. फुल्यांचा सार्वजनिक सत्यधर्म " म्हणजे नवमानवतावादाचा जणू जाहिरनामाच आहे"[१४] त्यामुळे त्यांचा हा ग्रंथ म्हणजे "मानवमुक्तीचा महान संदेश देणारा ज्ञान कोशच झाला आहे. "[१५] या ग्रंथात एकूण फुले यांनी २८ विषय हाताळलेले आहेत. त्यात " एकंदर जगात मा-नवप्रा□ी - □शाने सुखी होईल "? या प्रश्नाच्या उत्तरापासुन तर सर्व धर्माच्या पुस्तकांची कालक्षापेतता व अपुरेपणा, सृष्टीच्या निर्माणकर्त्याची ओळख, पुजा - पाठ - -ामस्मर□ - विधी - अनुष्ठाने यांची समाजोपयोगी स्वरुपात फेरमांडणी, दैव, स्वर्गनरक, पापपुण्य, जातीभेद, लिंगभेद इत्यादींची तर्क संगत व परखड चिकित्सा, मानव प्राण्याची व्यवच्छेदकता, सत्य, धर्म, आणि नीती यांचे □रे व इष्ट संकल्पना इ. विषयांची सविस्तर संवादात्मक चर्चा करण्यात आली आहे. सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे? या प्रश्नाचा उतरा दाखल जोतिरावांनी जे ३३ उपचार संकेत सांगितले आहे ते अत्यंत मार्मिक आहेत" [१६] या संपु□ □थात त्यांच्या विचारात अत्यंत बेडरपणा निर्भयता, वास्तव समजून घेण्याची वैज्ञानिक, तर्कशुध्द अशी स्पष्टता आहे. त्यांनी अस्तित्वात असलेल्या भारतीय समाजाचा अत्यंत खोलवर असा विचार केला आहे.

म. फुले समग्र वाङ्:मयाच्या प्रस्तावनेत 'सत्यधर्मा' बद्दल लक्ष्मण शास्त्री जोशी म्हणतात. " जोतीबांच्या विश्वकुटुंबवादाचा" 'सार्वजनिक सत्यधर्म' हा जाहिरनामा असून भारतीय लोकशाही क्रांतीची मूलभुत तत्वे विशद □रुन सांगणारा तो जाहिर नामा आहे"[१७] तर डॉ. एस.एस. भोसले म्हणतात " सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक" हा ग्रंथ आधुनिक काळातली "फुले स्मृती" आहे'[१८]. प्राचीन काळातल्या "मनुस्मृतीला " हा काटशह आहे. तर दत्ता भगत या □थाच्या संदर्भात आपले विवेचन स्पष्ट करतांना म्हणतात "भगवान तथागताच्या धम्मपदात जो सोपेपणा आहे. अथवा स्वामी चक्रधरांच्या सुत्रपाठात जो सुबोधपणा आहे अगदी तीच सूत्रमयता आणि तोच सुबोंधपणा जोतिरावांच्या या ग्रंथातील लेखनात आहे." [१९]" सार्वजनिक सत्यधर्म " म्हणजे "सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक न्यायाची जणू मानवी सनद आहे "[२०] यात शंका नाही.

**इशारा** - ' शेतक-यांचा असूड ' नंतर जोतीरावांनी ही पुस्तिका लिहिली. या पुस्तिकेत दुस-या बाजीरावच्या राज्यात जे अनन्वित हाल झाले. त्याचे हृदयद्रावक वर्णन केले आहे. महाराज सयाजीराव गायकवाड पुण्यात दोन महिने मुक्कामाला असतांना, काही शाळांच्या समारंभाना ते उपस्थित राहिले होते. त्यांच्या सन्मानार्थ म. फुले आणि त्यांच्या अनुयायांनी एक समारंभ घडविला होता. या समारंभाचे आमंत्रण न्या. रानडे यांना देण्यात आले होते. 'मराठे आणि महाराष्ट्र' या विषयावर त्यांचे भाषण झाले. आपल्या भाषणास रानडे म्हणाले होते की, "पूर्वी जरी जातीभेद

होते, तरी राष्ट्राच्या प्रगतीला त्यांनी काही अडथळा केला नाही. तीस वर्षापूर्वी शेतक-यांची जी परिस्थिती होती त्या पेक्षा ती आता अधिक चांगली झाली आहे." [२१] ही रानडेंची भुमिका म. फुले यांना मूळीच मान्य नव्हती. "म. फुले यांना रानडयांच्या भुमिकेत ब्राह्मणी मतलबाच्या सुप्त हेतू जाणवू लागला होता. न्या. रानडे यांचे सरकार दरबारी □ुप वजन होते. त्यांच्या या भुमिकेमुळे सरकारचीही दिशाभूल होण्याची शक्यता होती. त्यामुळे हे ले□न □र□ास म. फुले प्रवृत्त झाले. " [२२] या असे संमर्पक विवेचन दत्ता भगत यांनी या पुस्तिके बद्दल केले आहे.

**पद्यले□न** - म. फुले यांचे पद्यलेखन हे तळागाळातील शोषितांच्या सामाजिक जाणिवा आणि व्यथा वेदना तसेच पुरो□ामी सामाजिक आशय अभिव्यक्त कराणारे आहे. 'कविता करायची' यां संकल्पातून हे काव्यलेखन झालेले नसून आपला संदेश निरक्षर जनसामान्यांपर्यंत पोचावा, त्यांना तो सहज पाठ करता यावा, तो त्यांच्या स्मरणात पक्का बसावा या हेतूने त्यांनी पद्यरचना केल्या आहेत.

**ब्राह्मणाचे कसब** - जोतीरावांनी हा पद्यग्रंथ "महाराष्ट्र देशातील कुणबी, माळी, मांग, महार यांस परम प्रीतीने अर्पण केला आहे.[२३] "या अर्पणपत्रिकेमधून त्यांची लेखनप्रेरणा त्यांचे जीवनादर्श आणि त्यांची तात्विक भूमिका यांचे एकात्म दर्शन घडते",[२४] ब्राह्मण जातीच्या जुलमी अन्यायी व्यवस्थेचे चित्रण या पुस्तकात करण्यात आले आहे. एकुण नऊ विषयावरच्या नऊ पवाडयांचा अंतर्भाव या वीसपानी पुस्तिकेत आहे. शिक्षण घेऊन जे सुधारले, ते काही अंशी भटांच्या जुलमातून मुक्त झाले परंतु ऋतूशांती पासून ते दशक्रिया विधी अशा विविध प्रसंगी ब्राह्मण अज्ञा-ी धर्मबांधवांना धर्माच्या नावाखाली कशी लुबाडणूक करतो, भुलपाथा देऊन त्यांना कसा बळी पाडतो, या सर्व बंधनातून आपल्या अडाणी बांधवांना मुक्त करावे, त्याच प्रमाणे बहुजन समाजावर भटब्राह्मणांचे फार मोठे प्रस्थ आहे. त्यासाठी इंग्रज सरकारने बहुजनांना शिक्षण देऊन त्यांच्या दास्यत्वातून मुक्त करावे हया उद्देशाने जोतीरावांनी हा ग्रंथ लिहिला आहे.

**छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा** - हा पवाडा आपण 'लोकहितार्थ केला'[२५] असे मुखपृष्टावर जोतीरावांनी लिहिले आहे. "कुणबी माळी, महार मांग वैगैरे पाताळी घातलेल्या क्षेत्र्यांच्या उपयोगी हा पवाडा पडावा असा माझा हेतू आहे" [२६] असा खुलासा त्यांनी प्रस्तावनेत केला आहे. " शिवस्मारमाची कल्पना सर्वप्रथम फुल्यांनी मांडली [२७] असे भाई माधवराव बागल यांनी म. फुले गौरव ग्रंथात म्हटले आहे. जोतीरावांनी आपले स्वत:चे वर्ण-न □ुळवाडीभूषण ' असे □ले आहे. 'कुळवाडी - भूषण पवाडा गातो भोसल्याचा छत्रपती शिवाजीचा' [२८] हा पवाडा म्हणजे मराठी साहित्यात शिवाजी महाराजांच्या अलौकिक पराक्रमाचे व कर्तृत्वाचे उमटलेले पहिले प्रतिबिंब आहे. भा.ल. भोळयांनी जोतीरावांना 'आधुनिक युगातील शिवप्रभुंचे पहिले शहिर असे म्हटले आहे. [२९] हे विधा-न यथार्थ असे आहे.

**अखंड रचना** - त्यांची अखंड रचना ही तंतोतंत अंभगासारखीच आहे. "मराठी संतकवी पैकी तुकारामाचा सर्वाधिक प्रभाव जोतीरावाच्या पद्दरचनेवर आढळतो [३०] असे भा.ल. भोळे यांनी म्हटले आहे.

म.फुल्यांनी या अखंडात अनेकविध विषयांना स्पर्श केला आहे. एकुण पाच विभागात त्यांचे अखंड प्रसिध्द झाले आहेत. गणपती, भटाची वाणी, ढोंगी गुरु यासारख्या विषयावर उपरोधपूर्ण लेखन आहे तर, मानव, महंमद, बडोदयाचे महाराज यांची पद्यात्मक पत्रे या अखंडात समाविष्ट आहेत. नीती, सहिष्णूता, सदविवे□ या सार□या

संकल्पनाही विशद् केल्या आहेत. दत्ता भगत अखंड रचने संबंधी म्हणतात "म. फुले यांचे गद्यलेखन ज्याने वाचले नाही त्याने ही अखंड रचना वाचली तरी त्यांचा जीवनाविषयक दृष्टीकोन त्याला कळू शकतो" [३१]

**सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा विधी** - इ.स. १८७२ सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांसाठी म. फुले यांनी वरिल पुस्तिका लिहिली आहे. या पुस्तकात लग्नप्रसंगी म्हणावयाची मंगलकाष्टके, तसेच लग्नाप्रसंगी अनावश्यक खर्च टाळावेत, सोप्या भाषेतील आरती, दैनदिन पूजा विधी. याची माहिती दिली आहे. म. फुल्यांनी आपल्या विचारधर्माला आचार धर्माची जोड या ग्रंथाव्दारे दिली आहे.

**हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन ३**

सरकारने १८८२ साली सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील शिक्षणविषयक प्रश्नासंबंधी चौकशी करुन सुधारणा सूचविण्याविषयी एक मंडळ नेमले होते. ते हंटर कमिशन या नावाने ओळखले जाते. या हंटर कमिशनपुढे १९ ऑक्टोंबर १८८२ रोजी म. फुले यांनी आपले निवेदन सादर केले, त्यात शिक्षणाचा सा□ल्या-नं विचार केलेला दिसून येतो. प्राथमिक शिक्षणाची सक्तीची मागणी त्यांनी या निवेदनात केली होती. म. फुले यांचा शाळा चालविण्याचा अनुभव, अध्यापन प्रचंड वाचन, सखोल चिंतन आणि दु:खितांबद्दलची तळमळ या सर्वांचे प्रतिबिंब या निवेदनात पडले होते. यावरुन तत्कालीन शैक्षणिक परिस्थितीची कल्पना तर येतेच पण त्यावेळेचे शिक्षणविषयक विचार आजही चिंतनीय व मार्गदर्शक असे आहेत.

त्यावेळी भारतातील सर्व विचारवंत शिक्षण वरच्या वर्गातून सुरु करावे अशा मताचे होते. सरकारने कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाची आबाळ केली आहे असे सरकारला स्पष्टपणे सांगणारे जोतीराव हे ऐकमेव होते. शि□□ हे वरुन □ाली झिरपून येण्यापेक्षा ते पहिल्यांदा तळागळातील लोकांना दिले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

वरिल ग्रंथलेखना शिवाय जोतीराव फुले यांचे विद्याखात्यातील ब्राह्मणपंतोजी (१८६९), पुणे सत्यशोध□ समाजाचा रिपोर्ट (१८७३ - ७६), सत्यशोधक समाजाची तिस-या वार्षिक समारंभाची हकिकत (१८७७) दुष्काळाविषयक विनंती पत्र (१८७७) मलबारीच्या दोन टिपणाविषयीचे मत (१८८४), मराठी ग्रंथकार सभेस पत्र (१८८५) ग्रामजोश्यासंबंधी जाहिर खबर (१८८६), मामा परमानंद यांस पत्र (१८८६) आणि मृत्यू पत्र (१८८७) इ. स्फुटलेखन केले आहे. त्याच्या स्फुट लेखनात त्यांच्या व्यक्तीमत्वाचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

**म.फुल्यांची भाषा शैलीची वैशिष्टये -** जोतीरावाचे स्फुटलेखन असो, पद्यात्मक अखंड असोत की गद्यग्रंथ असोत त्यांच्या लेखनाची काही ठळक वैशिष्टये सर्वत्र आढळून येतात. त्यांच्या लेखन शैलीत त्यांचे व्यक्तीमत्व परिपु□ उमटलेले दिसते. फुल्यांची लेखनशैली तत्कालीन शैली पेक्षा वेगळी आहे. बहूजन समाजाला आपले विचार □ळण्यासाठी त्यांनी सतत बोली भाषेचा वापर केलेला दिसतो. जोतिरावांच्या भाषा शैली बाबत स.ग. मालशे लिहितात "त्यांचे जवळ आंत बाहेर काहिच नाही, जसा लेखक, तशी शैली म्हणतात त्यांचे याहून अधिक चांगले उदाहरण शोधून मिळणार नाही. "[३३] पुढे ते लिहितात की, त्यांची गद्यशैली उघडीनागडी वाटली तरी ती खास त्यांचीच आहे. तिला नागरतेची, प्रौढपणाची वा औपचारिकपणाची पडदपोसी ठाऊक नाही, ती रांगडी चढईखोर आणि विलक्षण बोलघेवडी "[३४] स.ग. मालशेंनी फुल्यांच्या लेखनशैलीचे मार्मिक असे विश्लेषण केले आहे.

थोडक्यात असे सांगता येईल की म. फुल्यांचे लेखन हे अत्यंत प्रवाही, चिंतनशीलता, संवादात्मक्ता वक्तृत्वसंपन्न, बोलीचा अवलंब असलेली आणि झपाटून टाकणारे असे आहे. म. फुले यांच्या समग्र वाड:मयातून

एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते की "त्यांचा हल्ला पध्दतीवर होता, विशिष्ट जातीतील माणसांवर नव्हता. हा विवे□ त्यांच्या हृदयात सतत जागृत होता" [३५] त्या काळातील सर्व समाजसुधारक पुढा-यापेक्षा विचाराने आणि आचाराने म. फुले किती तरी योजने पुढे होते हे त्याच्या वाङ्:मयावरुन स्पष्टपणे जाणवते यात शंका नाही.

**संदर्भ सुची -**


१. भोळे भा. ल. महात्मा जोतीराव फुले, प्रकाशन - साहित्य अकादेमी, मुंबई चौथी आवृत्ती २०१३, पृ. - २४
२. फडके य. दि., म. फुले समग्र वाङ्:मय, प्रकाशन - म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आवृत्ती - सुधारीत १९९१ पृ. - ५
३. फुले जोतीराव गोविंद, तृतीय रत्न, संपा. - दत्ता भगत, प्रकाशन - शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. आवृत्ती - पहिली, २००१ पृ. - ५८
४. फुले जोतीराव गोविंद, तृतीय रत्न, पृ. ६५
५. भोळे भा. ल., महात्मा जोतीराव फुले प्रकाशन, पृ. - २५
६. फुले जोतीराव गोविंद, तृतीयरत्न (मनोगत)
७. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - १२६
८. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - १२७
९. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - २६३
१०. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - २६३
११. हरी -र□ (संपाद□) म. फुले - साहित्य आणि चळवळ, प्रकाशक - प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग (डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले आणि राजर्षी शाहूमहाराज चरित्र - साध-न प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई. प्र. आवृत्ती पृ. - ३९२
१२. □ीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, प्रकाशन - पॉप्युलर प्रकाशन , मुंबई, पुनर्मुद्रण - २००० पृ. - २४६
१३. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - ३८३
१४. पाटणकर अरुण (संपादक) लोकराज्य, म. जोतीराव फुले विशेषांक १९९१ पृ. - ७४
१५. भोळे भा. ल., महात्मा जोतीराव फुले प्रकाशन, पृ. - ३५
१६. भोळे भा. ल., महात्मा जोतीराव फुले प्रकाशन, पृ. - ३६
१७. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - १५
१८. फुले जोतीराव गोविंद, तृतीयरत्न पृ. - ५३
१९. फुले जोतीराव गोविंद, तृतीयरत्न पृ. - ५३
२०. पाटणकर अरुण (संपादक) लोकराज्य, म. जोतीराव फुले विशेषांक १९९१ पृ. - ११६
२१. □ीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पृ. - २४१
२२. फुले जोतीराव गोविंद, तृतीयरत्न पृ. - ५०
२३. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - ९६
२४. फुले जोतीराव गोविंद, तृतीयरत्न पृ. - ४५
२५. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - ३७
२६. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - ४३

२७. पाटणकर अरुण (संपादक) लोकराज्य, पृ. - ६५
२८. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - ४५
२९. भोळे भा. ल., महात्मा जोतीराव फुले प्र□ाश-न, पृ. - ३९
३०. भोळे भा. ल., महात्मा जोतीराव फुले प्रकाशन, पृ. - ४१
३१. फुले जोतीराव गोविंद, तृतीयरत्न पृ. - ५५
३२. □ीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पृ. - १९६
३३. हरी -नर□ (संपाद□) म. फुले - साहित्य आणि चळवळ, पृ. - २८९
३४. हरी -नर□ (संपाद□) म. फुले - साहित्य आणि चळवळ, पृ. - २७५
३५. फडके य.दि. म. फुले समग्र वाङ्:मय - पृ. - २१